[विशेष-ध. आ. (मुं. सा. वि.) २-म.

59

सत्यमेव जयते

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये पुणे विभाग, पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव "चित्पावन मोडक कुल न्यास" फ्लॅट क्र. ब-५, चंद्रिका सोसायटी, बिबवेवाडी रस्ता, पुणे-३७.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ई-५४३८(P)

अर्जदार- श्री. रमेश बाळकृष्ण मोडक यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 27/12/2011 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का Deputy Charity Commissioner Pune

सही [signature] 28.12.2011

पदनाम धर्मादाय उप आयुक्त पुणे विभाग, पुणे

NAME : चित्पावन मोडक कुल न्यास
ADDRESS : पुणे ३७
THROUGH : आर.पी. पटवर्धन
SIGNATURE
RECEIPT No. 163
FOR W.M.D.C. LTD.

AUTHORISED SIGNATORY

Western Maharashtra Development Corporation Ltd., 2nd Floor, Kubera Chambers, Shivajinagar, Pune 411005. D-5/STP(V)/C.R.1014/2360-63/04

भारत 684900 SPECIAL ADHESIVE महाराष्ट्र
155035 OCT 14 2011
zero zero zero zero one zero zero 16:01
Rs.0000100/- PB5088
सत्यमेव जयते
INDIA STAMP DUTY MAHARASHTRA

Exh. 3

Deputy Charity Commissioner ★ Pune ★

मूळ प्रत ... क्रमांक 3
वर आहे. त्याची ... नि. क्र. 4
वर नों. क्र. २१८४/11 मध्ये ...
म्हणून मूळ प्रत परत करण्यात ...
आहे.

धर्मादाय उपआयुक्त
पुणे विभाग, पुणे

# चित्पावन मोडक कुल न्यास

## विश्वस्तपत्र

नोंदणी : मुंबई विश्वस्त कायदा

स्थापनपत्र तसेच विश्वस्तपत्राचा हा दस्त दि. १५ ऑक्टो. २०११ रोजी पुणे येथे खालील संस्थापक आणि विश्वस्त यांचे दरम्यान लिहीला तो येणेप्रमाणे :

१. . श्री.रमेश बाळकृष्ण मोडक, वय : ६९ वर्षे, व्यवसाय : निवृत्त,

राहणार : ब५, चन्द्रिका सोसायटी, बिबवेवाडी रस्ता, पुणे ४११ ०३७

यापुढे या दस्तात यांचा उल्लेख **"संस्थापक"** असा केला आहे.

आणि

१. श्री.श्रीधर वामन मोडक, वय : ६३ वर्षे, व्यवसाय : निवृत्त,

राहणार : ३३ मित्रमंडळ कॉलनी, पुणे ४११ ००९

२. . श्री.रमेश बाळकृष्ण मोडक, वय : ६९ वर्षे, व्यवसाय : निवृत्त,

राहणार : ब५, चन्द्रिका सोसायटी, बिबवेवाडी रस्ता, पुणे ४११ ०३७

३. . श्री.गोपाळ अंबादास मोडक, वय : ६८,व्यवसाय : निवृत्त,

राहणार : फ़्लॅट क्र.२०९, अनंत वसाहत, शारदा आर्केडजवळ, पुणे ४११ ०३७

४. . श्री.अनिल जगन्नाथ मोडक, वय : ६९ वर्षे, व्यवसाय : निवृत्त,

राहणार : फ़्लॅट क्र.ए-२०, शिवनगरी, महात्मा सोसायटीच्या मागे, कोथरुड, पुणे ४११ ०३८

५. सौ.संगिता नंदकुमार मोडक, वय : ६२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,

राहणार : फ़्लॅट क्र. ३२ , ब्रुक बॉंड सोसायटी, मॉडेल कॉलनी, पुणे ४११ ०१६

यापुढे या दस्तात यांचा उल्लेख **"विश्वस्त"** असा केला आहे.

उपरोक्त संस्थापक हे चित्पावन मोडक कुलातील व्यक्तिंच्या सर्वांगीण विकासासाठी एक सार्वजनिक न्यास निर्माण करु इच्छीतात आणि त्या अनुषंगाने त्यांनी रक्कम रुपये 1000/- चा निधी जमा करुन त्याचा चित्पावन मोडक कुलातील व्यक्तींसाठी न्यास निर्माण केला आहे. उपरोल्लेखीत विश्वस्तानी पहिले विश्वस्त म्हणून जबाबदारी स्विकारण्याचे ठरविले आहे.

या न्यासाचे स्वरुप, उद्दीष्टे, विश्वस्त निधि, त्याचा विनियोग, न्यासाची कार्यप्रणाली, घटना, नियम या बाबतच्या तरतुदी खालील प्रमाणे राहतील :

न्यासाचे नांव : **चित्पावन मोडक कुल न्यास**

न्यासाचा नोंदणीकृत पत्ता : ब५, चन्द्रिका सोसायटी, बिबवेवाडी रस्ता, पुणे ४११ ०३७

न्यासाचे लाभार्थी : चित्पावन मोडक कुलातील सर्व व्यक्ति.

"चित्पावन मोडक कुल" या व्याख्येत चित्पावन मोडक कुलातील सर्व व्यक्ती, मूळ चित्पावन मोडक असलेल्या परंतु सध्या इतर नाव धारण केलेल्या सर्व व्यक्ती आणि मूळ मोडक कुलातील परंतु लग्न होऊन इतर कुलामध्ये गेलेल्या मुली यांचा समावेश होईल (मात्र यात फक्त त्या मुलींचाच समावेश होईल; त्यांच्या परिवारातील इतर व्यक्तींचा समावेश होणार नाही.)

"चित्पावन मोडक कुल" याचा उल्लेख या दस्तामध्ये यापुढे **कुल** असा केला आहे.

हा न्यास कायमस्वरूपी (irrevocable) राहील.

**न्यासाची उद्दीष्टे :**

मुख्य उद्दीष्टे : (१) मोडक कुलवृत्तान्ताचे संकलन करून तो वेळोवेळी अद्ययावत करणे.

(२) चित्पावन मोडक कुलातील सर्व व्यक्तींचा सर्वांगीण विकास घडविण्याच्या अनुषंगाने असणारी सर्व उद्दीष्टे.

(३) चित्पावन मोडक कुलातील व्यक्तिंना एकत्र आणणे/ठेवणे.

वरील मुख्य उद्दीष्टांना अनुलक्षून न्यासाची इतर उद्दीष्टे खालीलप्रमाणे राहतील :

१. कुलातील सर्व गरजू व्यक्तींना सर्व प्रकारची, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायीक, वैद्यकीय मदत व मार्गदर्शन करणे.

२. अनाथांची सोय लावणे, त्यांना आधार, आश्रय देणे.

३. अपंग, वृद्ध, परित्यक्त मंडळींसाठी सोयीची गृहे, वसाहती उभारणे.

४. सर्व प्रकारच्या विद्यासंपादनास शिष्यवृत्ती रुपाने अथवा अन्य प्रकारे सहाय्य देणे.

५. प्रमुख शहरातून विद्यार्थ्यांची वसतिगृहात अथवा अन्य ठिकाणी राहण्याची व्यवस्था करणे आणि त्यासाठी आवश्यक वाटल्यास वसतीगृहे उभारणे आणि चालवणे.

६. आवश्यक ती शैक्षणिक केंद्रे सुरू करणे.

७. वैद्यकीय केंद्रे स्थापन करून वैद्यकीय सल्ला, उपचार देण्याची व्यवस्था करणे.

८. वैवाहीक सूची, व्यवसाय, नोकरी, धंदा यांची सूची करुन कुलातील सदस्यांना उपलब्ध करुन देणे.

९. कुलातील व्यक्तींसाठी व्यवसाय, धंदा, उद्योग ई. विषयांवर मदत, मार्गदर्शन.

१०.चित्पावन मोडक कुलपत्रिका सुरु करणे.

**न्यासाचे व्यवस्थापन :**

न्यासाचे व्यवस्थापन "विश्वस्त मंडळ" पाहील. विश्वस्त मंडळात कमीत कमी ५ आणि अधिकात अधिक ११ विश्वस्त सदस्य म्हणून असतील. वर उल्लेखिलेले न्यासाचे संस्थापक हे विश्वस्त मंडळातील पहिले पांच सदस्य असतील. उर्वरीत सहा विश्वस्तांची नियुक्ती मोडक कुलातील इतर इच्छूक व्यक्तींमधून केली जाईल. या नियुक्तीची पद्धत दस्ताचे पुढील भागात दिली आहे.

या न्यासाची स्थापना झाल्यापासून शक्यतो लगेचच मात्र एक महिन्याचे आंत प्रथम ५ विश्वस्त सभा घेऊन पहिल्या ५ विश्वस्तांमधून एका विश्वस्ताची अध्यक्ष म्हणून निवड करतील. अध्यक्ष ईतर विश्वस्तांच्या सल्ल्याने ठिकठिकाणच्या चित्पावन मोडक कुलातील इच्छुक व्यक्तींमधून उर्वरीत सहा विश्वस्तांची नियुक्ती करतील. ११ विश्वस्त मिळून न्यासाचा कारभार सर्वसंमतीने अथवा मताधिक्याने चालवतील. कारभाराच्या सुसुत्रतेसाठी हे ११ विश्वस्त त्यांच्यामधून इतर पदाधिकाऱ्यांची म्हणजेच उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, कार्यवाह /सचिव आणि सहकार्यवाह यांची नियुक्ती करतील.

न्यासाची संपत्ती आणि पैसा (फ़ंड) विश्वस्तांचे अखत्यारीत राहील आणि त्याचा विनियोग न्यासाच्या उद्दीष्टपूर्ती आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर गोष्टींसाठी या दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे केला जाईल.

**सल्लागार समिती :**

देशविदेशातील सर्व भागात राहणाऱ्या मोडक कुलातील सदस्यांचा न्यासाचे कामात सहभाग असावा तसेच न्यासाच्या उद्दीष्टांची अंमलबजावणी, कामकाजात सुधारणा , नवीन प्रकल्प हाती घेणे या बाबींमध्ये कुलातील सर्व सदस्यांची मते प्रातिनिधीक स्वरूपात जाणून घेण्याच्या उद्देशाने विश्वस्त मंडळ एक "सल्लागार समिती" गठीत करेल. या समितीमध्ये

देशविदेशाच्या विविध भागात राहणाऱ्या कुलातील इच्छूक प्रतिनिधींचा समावेश असेल. समितीमध्ये २० सदस्य असतील. विश्वस्त मंडळ आवश्यकतेनुसार सदस्य संख्या निर्धारीत करु शकेल. त्यांची नियुक्ती विश्वस्त मंडळ करेल. सल्लागार समिती विश्वस्त मंडळाला आवश्यक ती सर्व मदत, सहकार्य करेल, महत्वाच्या विषयांवर सल्ला देईल, सूचना करेल. सल्लागार समितीच्या सदस्यांमधून आवश्यकतेनुसार विश्वस्तांची रिक्त पदे भरता येतील. तसेच विविध समित्यांवर त्यातील प्रतिनिधींची नियुक्ती करता येईल.

वर्षातून किमान एकदा तरी सल्लागार समिती आणि विश्वस्त मंडळ यांची संयुक्त सभा घेतली जाईल. शक्यतो वार्षिक मोडक कुलसंमेलनांना जोडून न्यासाची वार्षिक संयुक्त सभा घेतली जावी जेणेकरून ज्यास्तीज्यास्त सदस्य त्यास उपस्थित राहू शकतील. मात्र कुलसंमेलन होवो अथवा न होवो, वर उल्लेख केल्याप्रमाणे वर्षातून किमान एकदा तरी सल्लागार समिती आणि विश्वस्त मंडळ यांची संयुक्त सभा घेतली जाईलच. या सभेमध्ये विश्वस्त मंडळ वर्षभरातील कामकाजाचा अहवाल, हिशेब सादर करून त्यास सभेची मान्यता घेईल. पुढील वर्षात करावयाची कामे, अंदाजपत्रक यास सभेची मंजूरी घेईल. याच वेळी सल्लागार समितीवरील सदस्यसंख्येत बदल आवश्यक असल्यास तो करणे अथवा रिक्त जागा भरणे, वेगवेगळया समित्या नेमणे आणि त्यावर सदस्यांची नियुक्ती करणे इत्यादी व्यवहार करण्यात येतील.

**विश्वस्तांचा कार्यकाल :**

विश्वस्त मंडळाचा कार्यकाल ५ वर्षांचा राहील. दर ५ वर्षांनी नवीन विश्वस्त मंडळ अस्तीत्वात येईल. मात्र प्रत्येक कार्यकाल समाप्तीच्या वेळी अस्तीत्वात असणाऱ्या विश्वस्त मंडळातील सदस्यांपैकी किमान दोन विश्वस्त पुढील विश्वस्त मंडळावर राहतील. ही तरतूद मावळत्या आणि नविन विश्वस्त मंडळाच्या कामकाजामध्ये सातत्य आणि सुसुत्रता रहावी या उद्देशाने केली आहे. त्यामुळे जे सदस्य न्यासाचे कामात सक्रीय असतील आणि ज्यांना कामकाजाची माहिती आहे अशा दोन सदस्यांची पुढील विश्वस्त मंडळावर नियुक्ती करणे अपेक्षीत आहे. मात्र कोणताही विश्वस्त सलगपणे दोना पेक्षा अधिक कार्यकालासाठी विश्वस्तपदावर राहू शकणार नाही.

विश्वस्त मंडळाचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी कार्यरत असलेले विश्वस्त कुलातील इच्छूक व्यक्तींकडून अर्ज मागवतील. रिक्त जागांपेक्षा अधिक अर्ज आल्यास विश्वस्त मंडळ त्या अर्जांमधून त्यांना योग्य वाटणाऱ्या व्यक्तिंची निवड करून रिक्त जागा भरेल. विश्वस्त मंडळातील नवीन सदस्य त्यांच्यामधून अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, सचिव/कार्यवाह असे पदाधिकारी निवडतील, ज्यांच्याकडे न्यासाचा आणि मंडळाचा कार्यभार, आर्थिक व्यवहार, दप्तर इ. सोपविले जाईल. हा बदल सल्लागार मंडळ आणि विश्वस्त मंडळ यांच्या वार्षिक संयुक्त सभेच्या वेळी करण्यात येईल.

मंडळावरील विश्वस्ताचे सदस्यत्व खालील कारणांनी रद्द होईल :

१. कार्यकाल संपल्याने

२. विश्वस्ताने पदाचा राजीनामा दिल्यास

३. अनैतकतेचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधासाठी शिक्षा झाल्यास

४. शारीरीक अथवा मानसीक दृष्ट्या असमर्थ झाल्यास

५. दिवाळखोर अथवा नादार म्हणून जाहीर झाल्यास

६. मंडळाने कारवाई करून काढून टाकल्यास

७. मृत्यु झाल्यास

**बैठका :**

वर उल्लेख केल्याप्रमाणे न्यासाचे स्थापनेनंतर लवकरात लवकर मात्र महीन्याच्या आत मंडळाची पहिली बैठक होईल. त्या नंतर वेळोवेळी आवश्यकतेनुसार मंडळाची बैठक घेण्यात येईल. मात्र वर्षातून किमान ४ बैठका घेणे अनिवार्य राहील आणि कोणत्याही दोन बैठकांमध्ये तीन महिन्यांपेक्षा अधिक अंतर असणार नाही. सल्लागार समिती आणि विश्वस्त मंडळ यांची किमान वर्षातून एकदा संयुक्त बैठक घेणे अनिवार्य राहील. अशा बैठकांना सर्व विश्वस्तांनी हजर राहणे अपेक्षीत आहे. मात्र प्रत्येक विश्वस्ताने एकूण बैठकांपैकी किमान ७५ टक्के बैठकांना उपस्थित असणे अत्यावश्यक आहे. सलग तीन बैठकांना अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीशिवाय अनुपस्थित राहील्यास अशा विश्वस्ताचे मंडळावरील सदस्यत्व रद्द होण्यास पात्र होईल.

वर उल्लेख केलेल्या बैठकांसाठी किमान 15 दिवसाची पूर्वसूचना सभेच्या विषय पत्रिकेसह देणे आवश्यक राहील.

**विश्वस्त मंडळाचे अधिकार :**

न्यासाचे उद्दीष्टपूर्तीसाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी करण्याचे अधिकार मंडळाला असतील. य़ामध्ये खालील अधिकारांचा अंतर्भाव असेल:

१. बँकेमध्ये न्यासाचे खाते उघडून परिचालन करणे.

२. न्यासासाठी देणग्या स्विकारणे, त्यांच्या पावत्या देणे आणि रकमांचा विनियोग करणे.

३. स्थावर, जंगम मालमत्ता खरेदी, विक्री करणे, गहाण, दान देणे, भाडेपट्ट्याने मिळकत देणे वा घेणे, जागेचे बांधकाम, दुरूस्ती करणे.

४. न्यासासाठी इमारत बांधणे.

५. न्यासाचे उद्दीष्टांसाठी कंत्राटी कामे देणे, कंत्राटदार, कुलमुखत्यार नेमणे

६. न्यासाच्या वतीने दस्तावेज करणे, स्विकारणे, दस्तांची नोंदणी करणे.

७. न्यायालय, प्राधिकरणे, अथवा अन्यत्र आवश्यक ते खटले, प्रकरणे दाखल करणे आणि न्यासाविरूद्धची प्रकरणे लढविणे, तडजोड करणे आणि या कामी वकील, सल्लागार नेमणे.

८. बँकांकडून कर्ज घेणे, त्याची परतफ़ेड करणे, तडजोड करणे, तारण म्हणून् न्यासाची मालमत्ता तारण देणे.

९. इतर संस्थांचे सदस्यत्व घेणे.

१०. इतर संस्था, न्यास यांना समान उद्दीष्टांसाठी देणग्य़ा देणे.

११. न्यासाचे उद्दिष्टपूर्तीसाठी आणि कार्याचे सुसुत्रीकरणासाठी उपसमित्या नेमून त्यावर योग्य व्यक्तींची नियुक्ती करणे.

१२. न्यासाचे कामासाठी कर्मचारी, हिशेबनीस, हिशेबतपासनीस इ. नेमणे, त्यांचे पगार, मानधन ठरविणे, देणे.

१३. विश्वस्त मंडळावरील सदस्यावर शिस्तभंगाची कारवाई करणे, निलंबन करणे.

**शिस्तपालन :**

विश्वस्त मंडळावरील प्रत्येक सदस्य न्यासाचे उद्दीष्टपूर्तीसाठी प्रामाणीकपणे कार्य करेल. वेळोवेळी घालून दिलेल्या नियमांचे कटाक्षाने पालन करेल आणि न्यासाला कमीपणा आणणारे अथवा न्यासाचे उद्दीष्टांना बाधा आणणारे, हितास हानी पोहोचविणारे कोणतेही काम करणार नाही. उपरोल्लेखीत बाबतीत कोणत्याही विश्वस्ताने शिस्तपालन न केल्यास, अथवा गैरवर्तन केल्यास तो शिस्तभंगाचे कारवाईस पात्र होईल. तसेच सलगपणे तीन बैठकांना परवानगीशिवाय अनुपस्थीत राहील्यास वर उल्लेख केल्याप्रमाणे अशा विश्वस्ताचे मंडळावरील सदस्यत्व रद्द होण्यास पात्र होईल. अशा सर्व वर्तनाची विश्वस्त मंडळाकडून चौकशी होवून सदस्याचे निलंबन होऊ शकेल. मात्र अशा प्रकारे कारवाई केल्यास त्यास सल्लागार मंडळाची मंजूरी घेणे आवश्यक राहिल.

**न्यासाचे दप्तर, हिशेब आणि आर्थिक बाबी :**

न्यासाचे वित्तीय वर्ष 1 एप्रील ते 31 मार्च असे राहील.

न्यासाचे नावे कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा शेड्युल्ड बँकेत खाते उघडून त्यामधूनच आर्थिक व्यवहार करावेत.

न्यासाचे बँकेचे खात्याचे व्यवहार करण्याबाबत विश्वस्त मंडळाने आवश्यक ते ठराव करून मंडळावरील सदस्यांपैकी मंडळ ठरवेल त्या कोणत्याही तीनपैकी दोन सदस्यांचे संयुक्त सह्यांनी व्यवहार करण्याचे अधिकार द्यावेत व अशाच सदस्यांनी खात्याचे व्यवहार करावेत. मात्र या तीन सदस्यांपैकी एक सदस्य हा कोषाध्यक्ष असेलच.

न्यासाची कागदपत्रे, दस्तावेज, न्यासाच्या कार्यालयात नोंद करून जतन करण्यात येतील. पत्रव्यवहार, कामकाजांच्या, इतिवृत्तांताच्या नोंदी वेळच्या वेळी करण्यात येतील. त्या

साठी आवश्यक तसेच कायद्याने आवश्यक नोंदवह्या ठेवण्यात येतील. आवश्यक ती विवरणपत्रे वेळच्या वेळी दाखल करण्यात येतील.

न्यासाच्या हिशेबाच्या नोंदी जमा-खर्चाचे व्यवहार घडतील तसतश्या लगेच करून हिशेबवह्या अद्ययावत ठेवण्यात येतील. वर्षातून किमान एकदा हिशेबतपासनीसांकडून हिशेब तपासून घेऊन त्यांचा अहवाल, अभिप्राय घेणे आवश्यक राहील. हिशेबतपासनीसाचा अहवाल धर्मदाय आयुक्तांना सादर केला जाईल, त्याचप्रमाणे सल्लागार समितीलाही वार्षिक सभेमध्ये सादर केला जाईल.

न्यासाच्या नावाने बँकेत स्वतंत्र खाते उघडण्यात येईल. बँकेची निवड विश्वस्त मंडळ करेल. बँक खात्याचे व्यवहार विश्वस्त मंडळ ठरविल त्या पांच विश्वस्तांपैकी कोणत्याही दोन विश्वस्तांच्या संयुक्त सह्यांनी होतील.

या प्रमाणे हे विश्वस्त व्यवस्थापत्र संस्थापक यानी आपल्या स्वत:च्या मर्जीने कोणाचेही कोणत्याही प्रकारचे दडपण नसताँना करुन ठेवले असून त्यानी व सर्व विश्वस्थनी सँमतीदर्शक आपापल्या सह्या पुणे मुक्कामी आज दिनाक 15/10/2011 रोजी दोन साक्षीदरच्य समक्ष करून ठेवल्या आहेत.

रमेश बाळकृष्ण मोडक

**संस्थापक**

साक्षीदार :

1. अरविंद वामन मोडक

वागीश्वरी, सी18ए,रेणुका सोसा

चिंतामणींनगर, पुणे 411037

2. श्रीधर त्रिंबक मोडक
A 8, अटल सोसायटी,
बिबवेवाडी, पुणे 411037

रमेश बाळकृष्ण मोडक

श्रीधर वामन मोडक

गोपाळ अंबादास मोडक

अनिल जगन्नाथ मोडक

सौ.संगिता नंदकुमार मोडक Smodak

**विश्वस्त**